# भारतीय राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक डॉ.बाबासाहेब आंबेडकर

डॉ.शिवाजी पवार
संशोधन मार्गदर्शक (इतिहास विभाग)
डी.बी.कॉलेज भोकर

छाया भिमराव उमरे
संशोधक विद्यार्थीनी
स्वा.रा.ती.म.ांदेड

**प्रस्तावा :-**

एका परिपुर्ण राष्ट्राच्या निर्मीतीसाठी विशिष्ठ भूभाग, भाषिक एकता, सार्वभौमत्व आणि राष्ट्रनिष्ठा बाळगणारी मर्यादित लोकसंख्या असणे आवश्यक आहे. परंतु भारतासारख्या विविधतेने नटलेल्या खंडप्राय देशात मात्र भाषीक विविधता, धार्मीक, भौगोलीक विविधता आणि अमर्याद लोकसंख्या असल्यामुळे वरिल घटकास या ठिकाणी अपवाद आढळून येतो. साधारणतः १८५७ च्या उठावापासून भारतात राष्ट्रवादी विचारसरणी प्रबळ बनली. भारताचा संबंध इतर राष्ट्रांशी येऊ लागला. जगातील राष्ट्रवादाचा प्रभाव आणि नवशिक्षीत तरुणांना आपल्या पारतंत्र्याची झालेली जाणिव यातून राष्ट्रवाद उद्भवला परंतु तरीही यामध्ये अनेक उणिवा असल्यामुळे भारतीयांना अनेक समस्यांना उदा :- जातियवाद, भाषावाद, धर्मवाद, प्रांतवाद सामोरे जावे लागत होते. भारतीय राष्ट्रवादाची अर्धशक्ती या समस्यांना तोंड देण्यातच खर्चि पडत असे याची जाणिव अनेक भारतीय विचारवंतांना झाल्यामुळे त्यांनी राष्ट्रीय आंदोलनापेक्षा समाज सुधारणेला अधिक महत्व दिले. राजा राममोहन रॉय पासून ते महात्मा फुले, रानडे, आगरकर आणि भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व जातीमध्ये एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्यच अर्पण केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्रीय एकात्मतेसाठी केलेल्या कार्यामुळे अनेक भारतीय पुढाऱ्यांपुढे फार मोठा आदर्श ठरलेले आहेत. एखाद्या राष्ट्राला आपले अस्तित्व टिकविण्यासाठी आणि आपला विकास करण्यासाठी त्यामध्ये एकात्मतेला अतिशय महत्व असते ही बाब त्यांनी कृती आणि युक्तीतून स्पष्ट करुन दाखविलेली आहे.

**विषय प्रवेश :-** ब्रिटीशांनी भारताला स्वातंत्र्य देण्याची घोषणा करण्याच्या कालखंडात डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांशक होते. त्यांच्यामते, भविष्यकाळात भारताला मिळणारे स्वातंत्र्य हे वास्तविक स्वातंत्र्य असायला पाहिजे होते ते केवळ सत्तापरिवर्तन असता कामा नये. यासाठी वेळोवेळी त्यांनी ब्रीटीश शासनाशी आणि भारतीय पुढाऱ्यांशी चर्चा केली . त्याकरीता गोलमेज परीषदेमध्ये अस्पृश्यांच्या विशेष अधिकाराची मागली केली. ज्याप्रमाणे मुस्लीमांना विशेष सोयी-सवलती मिळणार होत्या परंतु म. गांधी आणि अनेक भारतीय पुढाऱ्यानी केवळ अस्पृशांच्या हक्कावर नाराजी व्यक्त करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पुणे -करार करण्यास भाग पाडले. केवळ राष्ट्रीय एकात्मतेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्य बांधवाना मिळणाऱ्या अधिकाराचा त्याग करुन एक आदर्श समाजापुढे निर्माण केला.

कॉग्रेसच्या अनेक राष्ट्रीय नेत्यांना डॉ. बाबासाहेबांच्या राष्ट्रीय एकात्मतेबद्द्ल सांशकता व्यक्त केली. अशाच नेत्यापैकी आचार्य अत्रे होत. त्यांनी नवयुग या साप्ताहीकातुन डॉ. बाबासाहेबांवर कडक टिका केली. परंतु बाबासाहेबांच्या अगाध बुध्दीमता, विव्दता, आणि कर्तृत्व व व्यक्तीमत्वासमोर अत्रेचा विरोध अतीशय फिका पडला. आचार्य अत्रेंना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची प्रचिती येऊन ते त्यांचे कट्टर अनुयायी बाले. विरोधकांनी कितीही विरोध केला तरी डॉ.आंबेडकर हे अतिशय धीर गंभीर आणि आपल्या ध्येयाशी एकनिष्ठ राहत. त्यांनी कधीही आपल्या तत्वांशी तडजोड केलेली नव्हती डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना समकालीन असलेले एम.सी.राजा यानी मूंजे सोबत तडजोड केलेली होती. परंतू डॉ.बाबासाहेबांनी मात्र कधीही तसे केले नाही. २१ मे १९३२ रोजी पुण्यातील अहिल्याश्रमात बोलतांना बाबासाहेब म्हणाले, "भावी इतिहासकार जेव्हा गोलमेज परिषदेची निर्विकार बुध्दीने छाननी करतील तर ते माझ्या राष्ट्रसेवेचा गौरव केल्या वाचून राहाणार नाहीत माझ्या दलित बांधवांची ते माझ्या ध्येयावर अढळ श्रध्दा आहे ही गोष्ट मी मोठी समजतो.

निंदेची मला पर्वा नाही" ४ अशाच प्रकारे जातीय निवाड्या विरोधात म.गांधी उपोषण करीत असतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मात्र आपल्या विचारावर दृढ होते. त्यावेळी मदनमोहन मालविय, जयकर, सप्रू आदि. मंडळींनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर अनेक दोषारोप केले.त्यांना देशद्रोही, ब्रिटीशांचे हस्तक असे दोष देण्यात आले. त्यावर बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले, स्वतंत्र मतदारसंघ मुसलमान व शिखांना दिल्यामुळे देश विभक्त होत नसेल तर अस्पृश्यांना दिल्याने तो कसा काय विभक्त होतो? देशात अनेक महात्मे आले आणि गेले परंतु अस्पृश्य समाज आहे तेथेच आहे. शेवटी सर्व विरोधकांना नमवुन सप्टेंबर १९३२ मध्ये पुणे करार झाला. अस्पृश्यांना-स्पृशाकडुन न्याय मिळवुन देण्यासाठी अनेक सत्याग्रही-चळवळी करुन डॉ. बाबासाहेबांनी स्पृश्य-अस्पृश्य एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो विफल ठरला. १९३५ मध्ये येवला येथे धर्मांतराची घोषणा केली. त्यावेळी धर्मांतराचा म. गांधीसकट सर्वच कॉंग्रेस पुढाऱ्यांनी निषेध केला. परंतु डॉ. बाबासाहेब हाडाचे देशभक्त होते. त्यांनी अशी खात्री दिली ते म्हणाले, "प्रथम देश नंतर अस्पृश्य समाज आणि त्यानंतर हिंदी समाज अशी माझी त्रिपुटी आहे". अशाप्रकारे डॉ. बाबासाहेबांच्या निर्धारापुढे विरोधकही मान खाली घालत असत.

इ.स. १९३६ मध्ये सिलोन येथील बौध्द् भीक्षु लोकनाथांनी बाबासाहेबांना बौध्दधम्म स्वीकारावा अशी विनंती केली. त्यांच्या मते- त्याचवेळी जर अस्पृश्यांनी बौध्द धम्माचा स्विकार केला असता तर ब्रम्हदेशही भारताचा अविभाज्य भाग राहीला असता. परंतु स्पृश्याची मानसीकता बदलने फार अवघड होते. आणि आजही अवघड आहे. स्पृश्याचे प्रतिनिधीत्व करणारे मोठे पुढारीच आपली

मानसीकता बदलुन घेण्यास तयार नसेल तर अशिक्षित आणि परंपरावादयाकडुन बदलाची अपेक्षा करणे चुकीचे होते. विषमता ह हिंदुधर्माचा पाया असल्यामुळे ते अस्पृशांच्या विकासास बाधक होते. त्यामुळे धर्मांतराशिवाय पर्याय नव्हता तरीही भारत भूमीतला विज्ञानवादी -समतावादी धर्म बाबासाहेबांनी निवडला.

**स्त्री-पुरुष समानता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

डॉ. बाबासाहेबांनी स्त्री - स्वातंत्र्याचा विचार राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीकोणातुन केला. ज्या देशात ५० टक्के स्त्रीया स्वतंत्र नसतात. तो देश अर्धाधीक गुलाम असतो. असे मत मांडले.

मनुस्मृतीने स्त्रीयांना ही लेखल्यामुळे डॉ. बाबासाहेबांनी २५ डिसेंबर १९२७ साली मनुस्मृतीचे दहा केले. मनुच्या कायदयाव भाष्य करताना डॉ. बाबासाहेब म्हणतात. ही घटना जर मन:प्रक्षोभक मानली नाही तर या जगात दुसरे काहीही मन:क्षोभक मानता येणा नाही. हा कायदा करतांना मनुच्या मानला न्याय व अन्यायाची बिलकुल चाड वाटली नसावी. स्त्री स्वातंत्र्य मनुच्या डोळयात सलत होते म्हणुनच ते नष्ट करुन त्याने स्त्रीला दास्य कर्दमात रोखुन ठेवले.

डॉ. बाबासाहेबांनी केवळ दलीत आणि हिंदु स्त्रीयांच्या स्वातंत्र्यासाठी लढले नाही तर मुस्लीम स्त्रीयांना देखील समता आणि न्याय मीळवुन देण्याकरीता झगडले. त्यांच्या मते- मुस्लीम स्त्रीयांच्या मागासलेपणाचे एकमेव कारण म्हणजे पडदा पध्दती होय. मुस्ली स्त्रीयांना पुजेसाठी मशिदीतही जाऊ दिले जात नाही. जेव्हा बाहेर पडावयाचे असते तेव्हा बुरखा घालावा लागतो. या प्रथेमुळे त्यांच्य शारीरीक आणि मानसीक आरोग्याबरही दुष्परीणाम होतो. आरोग्यदायी सामाजीक जीवनाच्या आभावात त्यांच्यात अनैतीकतेचा प्रवेश होतो. बाहयसंसाराशी त्यांचा संबंध नसल्याने त्यांचे डोके सांसारीक शुल्लक शुल्लक कारणावरुन भांडणात गुंतुन असते. त्यामुळे त्यांची विचारशक्ती संकुचीत व कुंठित होते. स्त्री दास्याची प्रथा हिंदुपेक्षाही मुस्लीमामध्ये फार भयंकर होती . याची पुर्ण जाणीव डॉ बाबासाहेबांना झाल्यामुळे त्यांनी मुस्लीम स्त्री दास्य विमोचनासाठी संविधानात विशेष तरतूदी करण्यावर भर दिला. वरील बाब स्पष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब म्हणतात, काही हिंदुना त्यांच्या वाईट प्रथाचे ज्ञान असुन त्या घालविण्याकरीता काही हिंदु चळवळ प्रयत्नरत आहेत. मुसलमानांचे अगदी या ऊलट आहे. त्यांना तर आपल्यातील वाईट प्रथेचे भानही नाही.

डॉ. बाबासाहेबांनी आपल्या सामाजिक कार्याच्या सुरुवातीपासुनच अस्पृश्य स्त्रीयांच्या प्रबोधनाची सुरुवात केली. त्यांच्य कार्यात महिलांचा लक्षणीय सहभाग असे. अस्पृश्य स्त्रीयांनी आपल्या राहणीमानात सुधारणा करावी. अस्पृश्यतेचा कलंक धुण्यासाठ शिक्षण घेडुन ज्ञानी व्हावे. यासाठी डॉ. बाबासाहेब नेहमीच कार्येरत असत. डॉ. बाबासाहेबांनी महाड संग्रामात २७ डिसेंबर १९२७ रोज स्त्रीयांा उददेशुन भाषा केले. त्यात स्त्री शिक्षणाचे महत्त्व विशद केले. ज्ञान आणि विदया दोन गोष्टी काही पुरुषांसाठीच नाही , स्त्रियां नाही आवश्यक आहे. असा उपदेश करुन आपली पुढील पिढी जर तुम्हास सुधारावयाची असेल तर तुम्ही मुलींना शिक्षण दिल्याशिवा राहु नका. तसे पाहिले तर समस्त वर्गातील स्त्रीया दलितच आहेत, पण दलित स्त्रियांचे दु:ख सवर्ण स्त्रीयापेक्षा वेगळे असते म्हणु तिच्या काही समस्यासुध्दा वेगळयाच असतात.

हिंदु कोड बिलाव्दारे स्त्रीयांना वारसाहक्क, संपत्ती, घटस्पोट असे अनेक अधिकार देण्यात आले. संविधान कलम १ अन्वये स्त्री-पुरुष समानतेचा अधिकार देण्यात आला. त्या हिंदुकोड बीलासाठी बाबासाहेबांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. ह त्याग म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेचे श्रेष्ठतम उदाहरण होय.

**भारताचे परराष्ट्र धोरण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

भारताला स्वातंत्र्य मिळुन ६७ वर्षे झाल्यानंतरही आज परराष्ट्र धोरणात भारत कमकुवत राहीला आहे. पाकीस्तान अफगाणीस्तान, चीन या राष्ट्रांनी भारताला त्रस्त करुन सोडले आहे. शिवाय अमेरिकाही भारताविरोधात पाकीस्तानास पाठींबा देतं अणि काश्मीर प्रश्नी भारतावर संयुक्त राष्ट्रसंघ सतत दबाव आणत असल्यामुळे काश्मीरप्रश्न भारतासाठी एक डोकदु:खी होऊ बसलेला आहे. याविषयी बाबासाहेबांनी अतिशय उपयुक्त सुचना तत्कालीन मंत्रीमंडळास केलेल्या होत्या परंतु त्याकडे डोळझा केल्यामुळे वरील आजतागायत समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

**१) भारताची फाळणी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

तत्कालीन कॉंग्रेस नेत्यांनी भारताच्या फाळणीचा विरोध केलेला होता. परंतु डॉ. बाबासाहेबांनी फाळणीची अनिवार्यता स्प केली. भारतीय पुढाऱ्यांच्या मते, हिंदु-मुस्लीम हे एका नाण्याच्या दोन बाजु आहेत आणि स्वातंत्र्यप्राप्तीसाठी ते एकत्र लढत असल्यामु त्यांना एकसंघ भारत पाहिजे होता. परंतू स्वत: मुस्लीमानी आपली वेगळी चुल मांडलेली होती. असहयोग आंदोलनात मुस्लीम सहभा होण्याचे एकमेव कारण म्हणजे खिलाफत चळवळ होती. कॉंग्रेस नेत्यांनी म.गांधींच्या आग्रहास्तव खिलाफत चळवळीस बिनशर्त पाठिं दिलेला होता. पुढील काळात त्याचे परिवर्तन धार्मिक हिंसा, जातीय दंगलीत झाले. मोपला बंड, बंगाल, बिहार, पंजाब प्रातात झाले धार्मिक हिंसा त्याचेच फलित होते. तरीही गांधींनी त्यावर फार गांभियानी टिका केलेली व्हती. १४

सुरुवाती पासुनच इस्लामीक आक्रमण कर्त्यांनी हिंदुस्थानातील काफिरांना ठार करुन दार-उल-हरबचे दार-उल-इस्लाम म परिवर्तनावर भर दिलेला होता. स्वातंत्र्यपूर्व काळात होत असलेल्या हिंसक घटना आणि म.गांधीचा ऐक्याच आग्रह यावर भाष्य करता डॉ.बाबासाहेब म्हणतात, हिंदु-मुस्लीम ऐक्याच्या निरर्थकतेचे अजून कोणते प्रदर्शन होऊ शकते? हिंदु-मुस्लीम ऐक्य आतापर्यंत ते ए मृगजळ असले तरी कमीतकमी दृष्टी समजण्याजोगी होती. पाकिस्तान निर्मितीची अनिवार्यता स्पष्ट करतांना डॉ. बाबासाहेब म्हणता सामाजिक एकत्वाच्या अभावात राजनैतीक एकता प्राप्त करणे दुर्लभ आहे. जर ती प्राप्तही झाली असेल तरी ती उहाळयातील रोपट प्रमाणे अनिश्चित स्वरुपाची असेल, जे विरुध्द वाऱ्याच्या झोताने नष्ट होईल. राजीती एकतेच्या दृष्टीने भारत एक म्हणता येते. प

एक राज्य म्हणजे एक राष्ट्र होणे शक्य नाही. आणि जे राष्ट्र नसेल त्याच्या जीवन संघर्षात ते जीवीत राहाण्याची आशा फारच कमी असेल.

वरिल विचारांचे पडसाद पाकिस्तान निर्मितीनंतरही सतत भारताला जाणवत राहिले. आजही काश्मीरप्रश नी पाकिस्तान कुटील कारवाया करित आहे. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे आपल्या परराष्ट्रीय धोरणात दाखविलेली अदुरदृष्टीता होय. ज्याप्रमाणे घटनात्मक बाबतीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या बुध्दीचातुर्याचा आणि दुरदृष्टीचा वापर करण्यात आला त्याचप्रमाणे परराष्ट्रीय धोरणात देखील करणे आवश्यक होते. सरदार वल्लभभाई पटेलांना त्यावेळी याची प्रचिती आली होती. त्यांनी हैदराबाद मुक्ती संग्रामात डा.बाबासाहेबाच्या परराष्ट्र धोरणाचा अवलंब केला होता. डॉ.बाबासाहेबांच्या घटनात्मक अनिवार्यते विषयी बाळासाहेब खैरांना पत्र लिहीतांना सरदार वल्लभाई पटेल म्हणतात, 'शक्यतो १४ जूलैपुर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर निवडून येतील अशी व्यवस्था तुम्ही केलीच पाहिजे तुमच्यावर सोपवलेले काम पुरे करण्याचा एकच मार्ग उरतो तो म्हणजे अय उमेदवारांनी आपली नामांकन पत्रे मागे घ्यावीत यासाठी त्यांचे मन वळविण्याचा काही झाले तरी तूम्ही प्रयत्नांची पराकाष्टा करालच.'अशा प्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची देशहितासाठी किती आवश्यकता आहे याची जाणिव सरदार पटेलांना झालेली होती. त्यासाठी दि. ६ मे १९४८ रोजी सरदार पटेलांनी सी.पी. रामस्वामी अय्यर यांना पाठविलेल्या पत्रात लिहिले होते, "डॉ.बाबासाहेब शक्य तितके दिवस आमच्या बरोबर राहतील असे मी आपणास आश्वासन देतो. आपल्या भूमिकेचे समर्थन करण्यासाठी ते काहीही बोलतील. परंतू त्यांचा देशाला उपयोग आहे आणि होईल याची मला पूर्णतः जाणीव आहे." १८ अशाप्रकारे केवळ विधिमंत्रीपदा शिवाय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांकडे एखादे अन्य खाते सोपवून अथवा त्यांनी प्रस्तूत केलेल्या परराष्ट्र धोरणाचा अवलंब केल्यास भारताला लागलेला कर्करोग म्हणजे 'पाकिस्तान आणि काश्मीर प्रश्न' याचे निदान व्यवस्थीतरित्या करता आले असते. परंतू पंतप्रधानाची पदे हाती येताच पंडीत नेहरुंना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वर्चस्व नकोशे वाटू लागले आणि त्यांनी मांडलेले कोणतेही विधेयक ते पास होऊन दिल्यामुळे (हिंदू कोड बील) डॉ.नाबासाहेब आंबेडकरांनी विधिमंत्रीपदाचा राजीनामा दिला हा देखील देशाच्या एकात्मतेसाठी केलेला फार मोठा त्याग होता. डॉ.बाबासाहेबांचे राजीनामा देण्याचे अन्य कारणे म्हणजे पं. नेहरुंची परराष्ट्रनीती, भारत-पाकिस्तान संबंध, पूर्व बंगालमधील आपल्या लोकांची अत्याचारग्रस्त स्थिती कारण डॉ.बाबासाहेबांच्या मतानूसार पूर्वबंगालमधील आपल्या लोकांचा प्रश्न काश्मीर प्रश्नापेक्षाही असह्य आहे. असे असतांना देखील काश्मीरच्या प्रश्नाकडे जास्त लक्ष दिले जाते आणि त्यासाठी खर्चही जास्त केला जातो. हा खर्च कमी करायचा असेल तर डॉ.बाबासाहेबांच्या मते काश्मीरची फाळणी करणे, हा एक उपाय आहे. हिंदूची व बौध्दांची संख्या जास्त असलेला काश्मीरचाच भाग भारताो स्वतःकडे ठेवावा आणि मुस्लीमांची संख्या जास्त असलेला भाग पाकिस्तानास द्यावा. १९

**ाष्कर्ष :-** अशाप्रकारे बहिष्कृत भारत आणि मुकनायक या अंकाच्या प्रास्ताविकात मा.शरद पवारांनी सनातनी हिंदूच्या कुपमूंडक वृत्तीचे विश्लेषण करतांना बाबासाहेबांच्या विचारांची आठवण करुन दिली. आपल्याला बाहेर जाण्याचा मार्ग हिंदूधर्माने मोकळा ठेवला आहे पण बाहेरच्याला आत येण्याचा मार्ग बंद करण्यात आला आहे. या विधीमुळे पाणी आत येण्याची तोटी बंद पण पाणी सोडण्याची तुटी खुली असलेला हौद जसा शेवटी शुष्क होऊन त्यात पाण्याचा एक टाकही उरत नाही तशी स्थिती हिंदू समाजाची न व्हावी व हा सारा अनर्थ टाळावा असे जर वाटत असेल तर जातीभेदाचे उच्चाटन करणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु आजही याकडे विशेष लक्ष देवून अंमलबजावणी केली जात नाही. डॉ. बाबासाहेबानी स्पृश्य-अस्पृश्य, स्त्री-पुरुष, हिंदु-मुस्लीम, कामगार-भांडवलदार, शेतकरी-जमीनदार, जाता आणि पुढारी या सर्वांना परस्परातील बांधीलकीची जाणीव करवून एका सुत्रामध्ये बांधण्याचा प्रयत्न केलेला होता. गटातटात विभक्त न राहता संघटीत होऊन देशाच्या एकात्मतेला जोपासण्याची प्रेरणा दिलेली आहे.

**संदर्भ सुची**

१) कांबळे बबन (संपादक), दै.सम्राट विशेष लेख, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे गोलमेज परिषदेतील कार्य, अनुवादक बी.के.राऊत. २१ नोव्हेंबर २०१५.
२) कांबळे बबन, (संपादक) दै.सम्राट विशेष लेख.
३) मून वसंत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, नॅशनल बूक ट्रस्ट,इंडीया नवी दिल्ली. द्वि.आ. १९९९ पृ.ां.५४
४) मून, पृ. नं.५५
५) मून, पृ.नं.५७
६) मून, पृ.न.६६
७) मून, पृ. न.६५
८) डॉ.डाहाट धनराज, (संपा) "डॉ.बाबासहेब आंबेडकर भाषणे आणि विचार", संकेत प्रकाशन नागपूर, खंड १- च.आ.६ डिसेंबर २०११.
९) डॉ.डाहाट, पृ. न.८
१०) डॉ.बाबासाहेब आंबेडकर, "पाकिस्तान अथवा भारताची फाळणी," (अु) तुलसी पगारे, सुगत प्रकाशन नागपूर ऑक्टोबर २००४ पृ.१७४